महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २९९ वा | दिनांक : २७/०९/२०२५ | वार : शनिवार

# चंद्रकांत पाटील आणि जयंत पाटलांमध्ये शाब्दिक वार



**सांगली :** उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांच्यात चांगलाच वाद पेटल्याचे दिसत आहे. मी फेकलेल्या टोप्या तुमच्या डोक्यावर कशा काय बसल्या? असे नाव न घेत चंद्रकांत पाटील यांनी जयंत पाटील यांना सवाल केला आहे. तर महसूलमंत्री असताना पुण्यातील 342 कोटींचा भूखंड घोटाळा कसा दाबला गेला? अशी विचारणा जयंत पाटील यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट करत केली आहे.

गुरुवारी सांगली भाजप जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक यांच्या कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना चंद्रकांत पाटील यांनी जयंत पटलांवर जोरदार टीका केली होती. ते म्हणाले, आमदार गोपीचंद पडळकर यांच्याकडून राजारामबापू पाटील यांचे नाव घेऊन झालेल्या टीकेचे निमित्त करून जयंत पाटील नावाची सभा सांगलीत झाली. यानिमित्ताने विजनवासात गेलेले जयंत पाटील पुन्हा प्रकाशझोतात आले, पण असे करून राजकारणाच्या प्रकाशझोतात येता येत नाही हे आता येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकात दिसेल. पण, जयंत पाटील बचाव सभेत गोपीचंद पडळकर बाजूला राहिला आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, त्यांच्या कुटूंबावर टीका झाली. फडणवीस यांना आका, टरबुज्या अशा शब्दांत टीका करण्यात आली जी आम्ही चालू देणार नाही.

पुढे बोलताना चंद्रकांत पाटील म्हणाले, माझा घोटाळा काढू असे जयंत पाटील यांनी ट्विट केले, मी या आरोपांनी अस्वस्थ होत नाही. कारण असा घोटाळा झाला नाही हे 10 वेळा सिद्ध झाले, पण नाव न घेता एक अर्थमंत्री आणि त्याचा ऑनलाइन लॉटरी घोटाळा, एक ठाण्यातील आमदार आणि त्याची डायरी, एका पक्षाच्या नेत्याची नवी मुंबईतील मार्केट कमिटी हे नाव न घेता मी फेकलेल्या टोप्या तुमच्या डोक्यावर कशा काय बसल्या? तुम्ही धुतल्या तांदळागत आहात तर कशाला घाबरता? काचेच्या घरात बसून कुलूप लावून दुसऱ्याच्या घरावर दगड मारायचे नसतात, असा खोचक सल्लाही चंद्रकांत पाटलांनी दिला आहे.

तसेच राजारामबापू यांच्यावर पडळकर यांनी केलेल्या टीकेचे आम्ही समर्थन करणार नाही, पण हे कारण पुढे करून तुम्ही तुमच्या नेत्यावर टीका करणार असाल तर ती आम्ही सहन करणार नाही. त्यामुळे जयंत पाटील यांनी अशा पद्धतीची टीका टिप्पणी बंद करूया, असे पुढे येऊन सांगावे. आम्ही 1 ऑक्टोबरचा इशारा मोर्चा मागे घेऊ, असे आव्हान चंद्रकांत पाटलांनी जयंत पाटलांना केले आहे.

चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी केलेल्या टीकेला आज जयंत पाटलांनी प्रत्युत्तर दिले आहे. जयंत पाटील यांनी एक पोस्ट करत म्हटले, जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था अबाधित राखणे हे पालकमंत्र्यांचे काम असते, पण सांगलीचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील काल सांगलीत येऊन वाचाळवीरांना कसे वाचाळगिरी करायची हे ज्ञान देऊन गेले. सोबतच अनेक चौकशा करण्याची धमकी दिली, असे म्हणत जयंत पाटलांनी टीका केली आहे.

## शेतकऱ्यांना महिन्याचा पगार दिला असता, तर आभार मानले असते : हसन मुश्रीफ

**कोल्हापूर :** वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर खोचक टीका केली आहे. मुश्रीफ म्हणाले की, संजय राऊत यांच्याबद्दल न बोलणेच बरे, कारण जर त्यांनी माझ्यासारख्या विरोधी पक्षाच्या खासदारकीचा एक महिन्याचा पगार दिला असता, तर मी त्यांचे आज आभार मानले असते. राज्यात ओला दुष्काळ आणि पूरग्रस्तांच्या मदतीसंबंधी निर्णय घेतले जात नसल्यामुळे राऊत यांनी सरकारवर टीकेचा बाण सोडला होता. त्याचबरोबर राऊत यांच्या वक्तव्यावरून अजित पवार यांच्या गोट्या खेळण्याचे वक्तव्यही चर्चेत आहे.

हसन मुश्रीफ यांनी सांगितले की, सुप्रिया सुळे, संजय राऊत किंवा विजय वडेट्टीवार हे विरोधी पक्षात आहेत आणि त्यांचे काम सरकारला पेचात पकडणे आहे. मात्र शेतकऱ्यांना मदत करणे आणि संकटातून वाचवणे हे शासनाचे काम आहे. त्यांनी मराठवाड्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांबाबत चिंता व्यक्त करत सांगितले की, गेल्या चार दिवसात अंबाबाईच्या दर्शनाला लाखो भक्त आले आहेत. मी आज दर्शन घेऊन अंबाबाईला प्रार्थना केली की, मराठवाड्यावर आलेले महापुराचे संकट लवकर दूर होवो आणि पूरग्रस्त नागरिकांचे नुकसान भरून काढण्याची ताकद शासनाला मिळो.

दरम्यान, धाराशिव जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या व्हिडिओवरून विविध स्तरांवर टीका होत आहे. यावर बोलताना मुश्रीफ म्हणाले की, जर एखादा अधिकारी अशा प्रकारे पार्टीमध्ये सहभागी होत असेल, तर ते चुकीचे आहे, पण मला याबाबत सध्या कोणतीही माहिती नाही. जिल्हाधिकारी जर चुकीचे वागत असतील तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे याची नक्कीच दखल घेतील. त्यांनी सांगितले की, राज्य शासन आणि केंद्र सरकार मिळून पूरग्रस्तांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत करतील.

मुश्रीफ यांनी स्पष्ट केले की, शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचा निर्णय झाला आहे, परंतु त्याची अंमलबजावणी कधी होणार, हे ठरलेले नाही. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री योग्य वेळी निर्णय घेतील. प्रशासनाचे सर्व स्तर पूरग्रस्तांसाठी सज्ज आहेत आणि आवश्यक ती मदत तत्काळ पोहोचवली जाईल. त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत संवेदनशीलता दाखवून सांगितले की, माझा उद्देश फक्त राजकारण करणे नाही, तर शेतकरी आणि सामान्य नागरिकांना तातडीने मदत करणे हा आहे. राज्य आणि केंद्र सरकार एकत्र काम करत आहेत, त्यामुळे शेतकऱ्यांना जास्तीत जास्त लाभ मिळेल.

# राज्यसेवा पूर्व परीक्षा पुढे ढकलावी : जयंत पाटील

**सांगली :** राज्यात आलेल्या अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीमुळे शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबावर मोठे संकट कोसळले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीत झालेले नुकसान पाहून पुण्या-मुंबईत स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थीही चिंतेत आहेत. या पार्श्वभूमीवर, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी येत्या 28 सप्टेंबर रोजी होणारी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची राज्यसेवा पूर्व परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी केली आहे.

जयंत पाटील यांनी सोशल मीडियाद्वारे आपली भूमिका स्पष्ट करताना म्हटले आहे की, हवामान खात्याने दिलेल्या इशाऱ्यामुळे तसेच मराठवाड्यातील सध्याच्या पूर स्थितीमुळे अनेक गावे आणि शहरे पाण्याखाली गेली आहेत. वाहतूक व्यवस्था ठप्प झाल्याने विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रांवर पोहोचणे अवघड झाले आहे. या कठीण परिस्थितीत विद्यार्थ्यांची मानसिक स्थिती परीक्षा देण्यासारखी नाही. त्यामुळे, आयोगाने विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घ्यावा.

जयंत पाटील यांनी पुढे असेही म्हटले की, पूर परिस्थितीमुळे जरी विद्यार्थ्यांनी तयारी केली असली तरी, अशा बिकट परिस्थितीत परीक्षा देणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला परीक्षेत समान संधी मिळायला हवी. त्यामुळे, आयोगाने बळजबरी न करता विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घ्यावा, अशी विनंती त्यांनी केली आहे.

दरम्यान, जयंत पाटील यांनी पूरग्रस्त भागाचा दौरा करून माढा तालुक्यातील शेतीची पाहणी केली. या दौऱ्यादरम्यान त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना, सरकारने अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत करावी अशी मागणी केली.

यावेळी जयंत पाटील यांनी रस्त्यांच्या बांधकामावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सध्या सिमेंटचे रस्ते चुकीच्या पद्धतीने बनवले जात असल्याने पाणी जमिनीत मुरत नाही. तसेच, रस्त्यांची रचना चुकीची असल्यामुळे पुराचे पाणी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी योग्य प्रकारे वाहत नाही, ज्यामुळे पुराचा फटका बसतो, असे ते म्हणाले. अशा प्रकारच्या चुकीच्या डिझाइनमुळे १०० पेक्षा जास्त ठिकाणी पूरसदृश स्थिती निर्माण झाल्याचेही त्यांनी नमूद केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ सप्टेंबर २०२५


## "स्वच्छता ही सेवा" या उपक्रमा अंतर्गत अंतुर किल्ला येथे स्वच्छता मोहीम



**कन्नड :** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत राष्ट्रनेते पंतप्रधान मा.श्री.नरेंद्र मोदी यांचा जन्मदिनांक १७ सप्टेंबर २०२५ ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीमध्ये ' सेवा पंधरवडा ' साजरा करण्या अंतर्गत सहाय्यक संचालक (पुरातत्व) विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजी नगर आणि शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान, महाविद्यालय, कन्नड राष्ट्रीय सेवा योजना विभाग व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यसंरक्षित स्मारक अंतूर किल्ला, नागापूर, ता. कन्नड येथे स्वच्छता मोहीम उपक्रम राबविण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी के मगर राज्य प्रातू विभागाचे डॉ कामाजी डक यांनी मार्गदर्शन केले हे स्वच्छता अभियान यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रकाश महाजन डॉ. राकेश अहिरराव, डॉ. सीमा काशीद, डॉ. विजय मातकर, डॉ. जगदीश भेलोंडे, प्रा.सोमेश्वर मोगरे, प्रा. फड सर व स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सक्रिय सहभाग नोंदवला






## गडचिरोली जिल्ह्यात जाहिरात न देता व मुलाखती न होता आरोग्य कंत्राटी कर्मचाऱ्यांची पदभरती?




**गडचिरोली/ (०क्राईम ब्यूरो प्रतिनिधी)** दि. 25/9/2025:- राष्ट्रीय आरोग्य विभागात बोगस पदभरतीचे प्रयत्न करण्यात आले असल्याचे गडचिरोली जिल्हा परिषद परिसरात चर्चिले जात आहे. त्यात अनेक उमेदवारांची लाखो रुपयांची फसवणूक होणार असल्याचे सांगितले जाते. गडचिरोली जिल्हा परिषद आरोग्य विभागात कार्यरत असणारे हे कर्मचारी कोण ? याचा शोध वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने घेऊन उपाययोजना करणे आवश्यक आहे.

जाहिरात न देता तसेच कोणत्याही प्रकारच्या मुलाखती न घेता आरोग्य कंत्राटी कर्मचारी म्हणून थेट नियुक्तीपत्र दिले जाणार आहेत अशी चर्चा जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात सुरू आहे. अशा प्रकारच्या बोगस पदभरती करण्यासाठी काही आरोग्य कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या आणि जिल्हा परिषद आरोग्य कर्मचाऱ्यांची नावे लवकरच समोर येण्याची शक्यता आहे. यापूर्वी असाच प्रकार नाशिकमध्ये झाला होता आणि त्यांचा पर्दाफाश झाला होता, जिथे तीन ते अकरा महिन्यांसाठी भरती करून कायम करण्याची खोटी आश्वासने दिली गेली होती.

अशा प्रकारच्या फसवणुकीपासून सावध राहण्यासाठी, उमेदवारांनी भरती प्रक्रियेची माहिती अधिकृत संकेतस्थळां वरूनच घ्यावी . काही ठिकाणी 'राष्ट्रीय आरोग्य अभियान (National Health Mission - NHM)' च्या नावाने सॉफ्टवेअर व इतर पदांसाठी भरतीचे जाहिरात केली जाते. परंतु प्रत्यक्षात, NHM मध्ये अशी पदे नसतात आणि हे फसवणुकीचे प्रकार असतात. उमेदवारांनी कोणत्याही भरतीची माहिती महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळांवरून किंवा संबंधित विभागांच्या अधिकृत संकेतस्थळांवरूनच तपासावी.

एखाद्या पदाबद्दल किंवा भरती प्रक्रियेबद्दल शंका असेल, तर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून माहितीची पडताळणी करावी. संशयास्पद आमिशापासून सावध रहावे . तीन महिन्यांच्या कंत्राटी भरतीनंतर कायमस्वरूपी नोकरीचे आश्वासन देणाऱ्या आमीश दाखविणाऱ्या आरोग्य विभागात काम करणाऱ्यांपासुन सावध राहावे .नाशिकमध्ये एका बोगस भरतीचा प्रयत्न उघडकीस आला होता, जिथे तीन महिन्यांच्या भरतीनंतर कायम करण्याची खोटी आश्वासने दिली जात होती. अशा वेळी, योग्य ठिकाणी तक्रार दाखल करणे महत्त्वाचे आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये कंत्राटी मनुष्यबळ भरती करत आहे ही एक अधिकृत भरती प्रक्रिया आहे? . तुम्ही तुमच्या जिल्ह्याच्या राष्ट्रीय आरोग्य अभियान किंवा जिल्हा परिषदेच्या अधिकृत वेबसाइटला भेट देऊन अधिक माहिती मिळवू शकता, कारण भरती प्रक्रिया आणि नोटीस जिल्ह्यांनुसार बदलतात.

अधिकृत माहिती मिळवण्यासाठी काय करावे? जिल्हा परिषद वेबसाइट तपासा. राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत भरती प्रक्रिया जिल्हा परिषद स्तरावर होते, तसे तुमच्या जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेच्या वेबसाइटला भेट द्या. भरती प्रक्रियेतील जागा, पात्रता, अर्ज करण्याची मुदत आणि इतर सविस्तर माहितीसाठी अधिकृत जाहिरात आणि सूचनांचा अभ्यास करावा. काही वेळेस महाराष्ट्र शासन किंवा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिकृत संकेतस्थळांवरही माहीती उपलब्ध आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत होणारी भरती प्रक्रिया ही अधिकृत शासकीय जाहिरातींद्वारे होते, जी शासनाच्या अधिकृत संकेतस्थळांवर (उदा.nhm.maharashtra.gov.in किंवा maharashtra.gov.in ) प्रकाशित केल्या जातात. NHM अंतर्गत पद भरतीसाठी अर्ज करायचा असल्यास, या अधिकृत वेबसाइट्स तपासावी. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत होणाऱ्या सर्व पदांच्या भरतीसाठी, उमेदवारांनी फक्त महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या (उदा. phd.maharashtra.gov.in ) आणि राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या (NHM) अधिकृत संकेतस्थळांना भेट द्यावी. आमिषे देणाऱ्या व्यक्तीपासून सावध रहावे.

NHM मध्ये नोकरीची हमी किंवा अवास्तव वेतन देण्याचे वचन देणाऱ्या व्यक्तीपासून सावध रहावेनोकरीच्या अटी आणि शर्ती तपासणे खूप आवश्यक आहे. गडचिरोली जिल्हा परिषद अंतर्गत कंत्राटी आरोग्य कर्मचारी म्हणून नियुक्ती दिली जाणार असल्याने अनेक उमेदवारांची फसवणूक होणार आहे. या गंभीर बाबीकडे गडचिरोली परिषद आरोग्य प्रशासनाने तसेच जिल्हा प्रशासनाने पराकोटीने लक्ष देण्याची गरज आहे.

धानोरा येथे कार्यरत असलेल्या एका कर्मचाऱ्यांस जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी खास आपल्या कार्यालयात बोलावून घेतले असल्याचीही चर्चा आहेआणि तो DHO यांच्या सांगण्यानुसार वसुली करणारा स्पेशल कर्मचारी असल्याचीही चर्चा आरोग्य विभागात सुरू आहे.गोकुळनगर परिसरातील शिवाजी कॉलेजच्या मागे त्याचं घर असुनत्यांच्या घरी जिल्हा परिषद अंतर्गत हॉस्पिटल सुरू आहे. आणि प्रति महीना 50 हजार रुपये घर भाडे घेत आहे.मात्र तो धानोरा येथे जात नाही. असे सांगितले जात आहे.

आरोग्य विभागात नेमके किती आणि कोणकोणत्या प्रकारचे गौडबंगाल होत आहेत याचा शोध वरिष्ठ अधिकारी घेतील काय?? की वरिष्ठ अधिकारीच अशा प्रकरणात हिस्सेदार ठरणार आहेत ? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ सप्टेंबर २०२५


## किशोरवयीन मुला-मुलींसाठी मार्गदर्शन व आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात!



छत्रपती संभाजीनगर : ज्ञानेश्वर विद्यालय, बेगमपुरा येथे शुक्रवार, २५ सप्टेंबर २०२५ रोजी किशोरवयीन मुला-मुलींसाठी मार्गदर्शन व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' अभियानांतर्गत, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजी नगर यांच्या वतीने हे शिबिर घेण्यात आले.

या शिबिरामध्ये डॉ. शिल्पा पवार (प्रोफेसर, वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजी नगर) यांनी किशोरवयीन मुला-मुलींना मार्गदर्शन केले व त्यांची आरोग्य तपासणी केली. त्यांच्यासोबत डॉ. अभिषेक जैन, डॉ. स्वानीक दुमणे, डॉ. समिरा खान, डॉ. युक्ता, डॉ. राज, आणि डॉ. कृष्णा या तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकानेही मोलाची सेवा दिली.

शालेय स्तरावर आरोग्य तपासणी आणि योग्य मार्गदर्शन मिळाल्याने विद्यार्थ्यांनी व पालकांनी समाधान व्यक्त केले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे, पर्यवेक्षक श्री. संभाजी तांगडे, ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती मंगल पवार, श्रीमती आरती बिरोटे आणि श्री. भरत झोडपे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## डॉ.सौ. इं.भा.पा. महिला महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींची कर्णपुरा येथे स्वच्छता सेवा




छत्रपती संभाजीनगर : येथील डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व ग्रीन क्लबच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 26 सप्टेंबर 2025 शुक्रवार रोजी श्री तुळजाभवानी मंदिर कर्णपुरा क्षेत्र येथे 'स्वच्छता ही सेवा' या अभियाना अंतर्गत सकाळी 9 ते 12 या वेळेत स्वच्छता अभियान राबवण्यात आले. या स्वच्छता अभियानात प्रामुख्याने प्रवेशद्वार, मंदिरासमोरील परिसर, मंदिराचा गाभारा, मंदिरा बाहेरील परिसर यांची मोठ्या प्रमाणात स्वच्छता करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविका व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी व ग्रीन क्लब समन्वयक डॉ. मीनल श्रीगिरीवार, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. अन्विता अग्रवाल यांच्या देखरेखी मध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिक जमा करून स्वच्छता करण्यात आली व महानगरपालिकेला ते सुपूर्त करण्यात आले.

महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांचे मार्गदर्शन तसेच प्रा. मंगल मोरे, डॉ. प्रतिभा धोंडकर, प्रा. विशाखा जोशी, प्रा. वर्षा पाईकराव यांचे या स्वच्छता अभियानात सहकार्य लाभले.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ सप्टेंबर २०२५


## मनपा केंद्रीय प्रा. शाळा, मुकुंदवाडी येथे आ. अनुराधाताई अतुल चव्हाण यांच्या हस्ते वह्यांचे वाटप



**मुकुंदवाडी :** मनपा केंद्रीय प्राथमिक शाळेत आदरणीय आमदार मा. श्रीमती अनुराधाताई अतुल चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष समाजोपयोगी उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना वह्यांचे (शैक्षणिक साहित्य) वाटप करण्यात आले.

या प्रसंगी मुख्याध्यापक श्री के. बी. चौधरी यांनी प्रास्ताविक करून शाळेच्या प्रगतीचा आढावा सादर केला. आमदार ताईंनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि सर्वांगीण प्रगतीसाठी आपण सदैव सहकार्य करू असे आश्वासन दिले.

शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातील उपक्रमांचे संक्षिप्त प्रदर्शन सादर केले. स्मार्ट सिटी योजनेंतर्गत मिळालेल्या आधुनिक सुविधा, D-Mart तर्फे प्राप्त वाचनालय व संगणक रूम, तसेच रायफल शूटिंगमध्ये जिल्हास्तरीय पदके मिळवलेले विद्यार्थी – या सर्व यशांचा गौरव करण्यात आला.

यानंतर आदरणीय आमदार मा. श्रीमती अनुराधाताई अतुल चव्हाण यांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. समारोप प्रसंगी आमदार ताईंना वाढदिवसानिमित्त संगीतमय शुभेच्छा देण्यात आल्या.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडिकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903


# मराठवाडा भूषण पुरस्काराने मोहन जाधव सन्मानित



मुरूम, ता. उमरगा येथील मोहन जाधव यांना मराठवाडा भूषण पुरस्कार प्रदान करताना डॉ. श्रीपाल सबनीस, डॉ. तात्याराव लहाने, डॉ. भाऊसाहेब जाधव, अभिमन्यू पवार व अन्य.

**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** पुणे येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या औचित्याने थोर साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस, पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, डॉ. भाऊसाहेब जाधव, अभिमन्यू पवार व प्रकाश इंगोले यांच्या विशेष उपस्थितीत सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र, शाल, हार घालून मान्यवरांच्या हस्ते शुक्रवारी (ता.२५) रोजी मुरूमचे सुपुत्र तथा पत्रकार मोहन जाधव यांना मराठवाडा भूषण पुरस्कार- २०२५ ने गौरविण्यात आले.

पुरस्कारानंतर माध्यमांच्या प्रतिनिधीशी बोलताना मोहन जाधव म्हणाले की, हा पुरस्कार माझ्या नावाने जरी घोषित झाला असला, तरी तो खराखुरा माझ्या गावकऱ्यांचा शेतकरी-कामगार मायबाप जनतेचा आहे. पत्रकारितेला केवळ दोन वर्षे पूर्ण होत आहेत, पण या अल्पावधीतच शेतकऱ्यांच्या व्यथा, सर्वसामान्यांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचवणे, अन्यायाविरुद्ध आवाज बुलंद करणे, हेच ध्येय समोर ठेवले.

दरम्यान अतिवृष्टीने उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या संघर्षाची नोंद प्रशासनाकडे पोहोचवण्यासाठी सलग पंधरा दिवस केलेली धडपड आजही मनात जिवंत आहे. हा पुरस्कार म्हणजे त्याच जनआवाजाचा गौरव आहे. पत्रकारितेच्या क्षेत्रात मला प्रेरणा देणारे दै. आरंभ मराठीचे संपादक चंद्रसेन देशमुख, पत्रकारितेची वाट दाखवणारे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष तथा प्रा. डॉ. महेश मोटे व ज्येष्ठ पत्रकार रफिक पटेल यांचे सातत्याने मार्गदर्शन लाभले.

याशिवाय सामाजिक चळवळीच्या पार्श्वभूमीवर प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात लोकशाहीचा चौथा स्तंभ टिकून ठेवण्यासाठी मार्गदर्शन करणारे संभाजी ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष अभिमन्यू पवार, जिवलग सहकारी सीपीआय चे नेते कॉम्रेड आकाश शिंदे, छोटे बंधु एआयएसएफ चे जिल्हाध्यक्ष कॉम्रेड लखन भोंडवे यांच्या सहवासाने सत्य, स्पष्ट व निर्भीड पत्रकारिता करण्याची प्रेरणा मिळत राहिली.

पुरस्काराचे खरे मानकरी माझ्या गावची माती, माणसं, माझे शहर व परिसर, माझ्यावर जीवापाड प्रेम करणारी जिवलग, मुरुम शहर पत्रकार संघटनेचे सर्व पत्रकार बांधव. पुढील काळात देखील शेती, माती, संस्कृती व राष्ट्रहितासाठी सदैव कटिबद्ध राहू, असे ते आमच्या प्रतिनिधीशी बोलताना म्हणाले.

# उच्च शिक्षण सहसंचालक यांना सम्यक विद्यार्थी आंदोलनच्या वतीने जिल्हा अध्यक्ष अक्रम खान यांच्या नेतृत्वात मुलींच्या शैक्षणिक शुल्क माफी संदर्भात निवेदन देण्यात आले



**छत्रपती संभाजीनगर :** आज उच्च शिक्षण सहसंचालक यांची सम्यक विद्यार्थी आंदोलनच्या वतीने जिल्हा अध्यक्ष अक्रम खान यांच्या नेतृत्वात भेट घेऊन मुलींच्या शैक्षणिक शुल्क माफीवर काही महाविद्यालयांकडून अन्यायकारक शुल्क वसुली करत आहे ती त्वरीत थांबवण्यात यावी या संदर्भात निवेदन देण्यात आले.

राज्य सरकारने मुलींसाठी शैक्षणिक शुल्क माफीचा ऐतिहासिक निर्णय घेतलेला असताना काही महाविद्यालये शासन आदेशाकडे दुर्लक्ष करून मुली विद्यार्थिनींकडून सक्तीने शुल्क वसूल करीत असल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे.हा प्रकार शासनाच्या निर्णयाला हरताळ फासणारा असून विद्यार्थिनी व त्यांच्या पालकांवर अन्यायकारक आर्थिक भार टाकणारा आहे.

त्यामुळे उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालकांना निवेदन देऊन खालील मागण्या करण्यात आल्या आहेत :1) शासन निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी सर्व महाविद्यालयांना तातडीने पत्र काढावे.2) सक्तीने वसूल केलेले शुल्क परत करण्याच्या स्पष्ट सूचना द्याव्यात.3) शासन निर्णय न पाळणाऱ्या महाविद्यालयांवर कठोर कार्यवाही करावी.विद्यार्थिनींच्या शैक्षणिक हिताचे रक्षण व्हावे आणि शासनाच्या निर्णयाचा योग्य फायदा प्रत्येक मुलीपर्यंत पोहोचावा, हीच आमची अपेक्षा आहे.सोबत,शरीक काझी, अर्शिया कुरेशी, बेग साइमा, सैय्यद बुशरा, तुबा रहनम, उम्ममा,अलमीरा, मेहविश, सैय्यद अहसना अमोल बोर्डे ,जैद,खान साद पटेल , फैजल कुरैशी ,अमोल घुगे

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ सप्टेंबर २०२५


## भिमसैनिकांकडून तिसरा स्वाभिमानी विजयी दिवस जल्लोशात साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** दरवर्षी प्रमाणे या वर्षीही आंॅबेडकरी चळवळीच्या जिगरबाज निष्ठावान भिमसैनिकांच्या वतीने मोठ्या जल्लोशात प्रती विद्यापीठ कमाण पतन करित स्वाभिमानी विजय दिवस साजरा करण्यात आला.

तीन वर्षांपुर्वी विद्यापीठ प्रशासनाकडून सुशोभीकरणाच्या नावे जानिवपूर्वक अनेक शहीद भिमसैनिकांच्या त्याग व बलिदानातुन उभ्या असलेल्या ऐतिहासिक डाॅ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ कमाणीचे महत्व कमी करण्याच्या उद्देश्याने त्यासमोरच बांधन्यात आलेली भव्य प्रतीकमान ही काही जागरुक स्वाभिमानी भिमसैनिकांनी अनेक त्रीव आंदोलने करून पाडली हाॅेती,प्रती कमाण पाडण्यासाठी लढा उभारणार्या भिमसैनिकांनी या आंदोलना दरम्यान आलेल्या कटु अनुभव सांगितले.प्रती कमानीचे उभे असलेल्या तिन काॅलम पैकी केवळ एकच काॅलम काढत प्रशासनाने काही संघटनांचा पाठींबा मिळवीत या आंदोलनात फुट पाडली व प्रती कमाणीचे उर्वरीत दोन काॅलम व उर्वरित बांधकाम काढणार नाही अशी आडमुठी भुमिका विद्यापीठ प्रशासनानें घेतली होती परंतु आंॅबेडकरवादी बहुजन विकास समितीने व काही जागरूक स्वाभिमानी भिमसैनिकांनी हा लढा कशाचीही पर्वा न करता हा लढा सुरुच ठेवला त्रिव आंदोलने करीत शेवटी प्रशासनाला नमवीत प्रती कमाणीचे उर्वरीत सर्वच बांधकाम हे जेसीबी मशीन लावुन पाडण्यास भाग पाडले व यावेळी एकच आंनदोस्तव भिमसैनिकांनी साजरा केला होता.

तेव्हा पासुन या २६ सप्टेंबर रोजी या समाज अस्मीतेच्या लढ्याची आठवण म्हणुन "स्वाभिमानी विजय दिवस" साजरा केला जातो.या घटनेस आज तीन वर्ष पुर्ण झाल्याने सर्व पक्षीय आंबेडकरवादी पक्ष संघटना व आंबेडकरवादी बहुजन विकास समितीने आज महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुण अभिवादन करुन विद्यापीठ गेटला शहीद स्मारकाला पुष्पचक्र अर्पण करुण अभिवादन करीत पुज्यनिय बौद्ध भिक्खु संघाने संघप्रिय थेरो, बोधीधम्मो,आर आनंद, भंते निर्वान यांच्या वतीने बौद्ध वंदना घेण्यात आली यानंतर महापुरुषांच्या व नामांतर शहीद अमर रहें, स्वाभिमानी विजय दिनाचा विजय असो अशा गगनभेदी घोषणा देत भिमसैनिकांनी परीसर दणाणुन सोडला.यानंतर भव्य आतिशबाजी करीत नागरीकांना मिठाई वाटप करित स्वाभिमानी विजयी दिवस जल्लोशात साजरा करण्यात आला यावेळी आंबेडकरवादी बहुजन विकास समिती अध्यक्ष दिपक निकाळजे,कुंदन लाटे,अमित वाहुळ, मुकेश खोतकर,गुल्लु वाकेकर,संदीप जाधव, विष्णु जगताप, धम्मपाल वनवे,अरविंद कांबळे,प्रांतोष वाघमारे,सतिश शिंदे, मेघानंद जाधव,सचिन जोगदंड, संजय सातपुते, जयश्री शिरके, सुनिल कीर्तिशाही, कपिल बनकर,सोनु नरवडे,राहुल अंकूशे,संतोष चव्हाण,सिध्दोधन मोरे,नागेश केदारे, नागेश जावळे,ॲड.अतुल कांबळे,सचिन शिंगाडे, सिध्दार्थ जाधव, विकास रोडे,किशोर खिल्लारे,राजु खांडेकर, लखन सूर्यवंशी,नितीन निकाळजे,अमर आंबेडकर,सिध्दार्थ सुर्यवंशी,दिपक गवळी,लखन सुर्यवंशी,अनामी मोरे, सम्यक सरपे,दादाराव सोनट्टके, इद्रीस पठान अनिल नवगिरे, प्रेम जाधव,भैय्या बनकर, नासिर पठाण, निखिल निकाळजे, गणेश वाहुळ,शुभम सौदागर,विशाल वाहुळ व आंबेडकरी चळवळीच्या भीमसैनिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

## उज्ज्वल भविष्यासाठी स्वप्न सत्यात आणावीत : युवराज पाटील



**उमरगा :** जीवनात संघर्ष असतोच या संघर्षाला सामोरे जाताना आपली स्वप्न पूर्ण करण्यासाठी ज्ञान आणि कौशल्या बरोबरच मूल्य आणि संस्कार जपले पाहिजेत उज्वल भविष्यासाठी स्वप्न सत्यात आणावी लागतील आणि स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी संघर्ष करावा लागेल, त्यासाठी संवेदनांचा स्वीकार आणि दांभिकतेला दूर करून आयुष्य घडवावे असे मत कोल्हापूर येथील मा. युवराज पाटील यांनी व्यक्त केले.श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आयोजित कर्मयोगी श्रीधररावजी मोरे व्याख्यानमालेचे पहिले पुष्पगुंतला ते बोलत होते.

व्याख्यानमालेचे उद्घाटन भारत शिक्षण संस्थेचे सहसचिव डॉ. सुभाष वाघमोडे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. भानुदासराव माने होते. याप्रसंगी भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. अमोल मोरे मा. सुरेश दाजी बिराजदार, मा. अशोकरावजी पाटील प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांची प्रमुख उपस्थिती होती.पुढे बोलताना मा. युवराज पाटील म्हणाले की सध्याच्या काळात तरुणांमध्ये संवेदनांपेक्षा दांभिकतेला महत्त्व दिले जात आहे. प्रगतीच्या नावाखाली आम्ही संवेदना विसरतो आणि दांभिकतेला महत्त्व देतो त्यामुळे आम्हाला आमचे भविष्य उज्वल करायचे असेल तर आयुष्याकडून आम्हाला काय हवे आहे हे ठरवावे लागेल.

आमच्या क्षमता आणि मर्यादांची ओळख जर योग्य वयात झाली नाही तर भविष्य कठीण असल्याचे मत यावेळी त्यांनी बोलताना व्यक्त केले. अपयश सर्वांच्याच वाट्याला येते परंतु आपल्या क्षमतांचा योग्य वापर केल्यास भविष्य उज्वल बनेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले, प्रा. शैलेश महामुनी, प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव, डॉ. डी. बी. ढोबळे, प्रभारी प्राध्यापक डॉ. अशोक पदमपल्ले, प्रा. एम. डी. साळुंके, रोटरी चे अध्यक्ष डॉक्टर मेनकुदले सचिव जोशी माझी उपप्राचार्य चंद्रकांत डॉक्टर चंद्रकांत बिराजदार प्राध्यापक बी एन गायकवाड प्राध्यापक तडोळगे निवृत्त प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी निमंत्रित एडवोकेट शुभदा पोतदार रेखा सूर्यवंशी हरिप्रसाद चांडक प्रशांत कुलकर्णी महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

व्याख्यानमालेच प्रास्ताविक प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी केले तर सूत्रसंचालन आणि उपस्थितांचे आभार डॉ. समाधान पसरकल्ले यांनी केले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्पायरल व हार्ड बायडींग
- डेझर्टेशन
- कलर प्रिंट
- स्कॅनिंग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ सप्टेंबर २०२५



प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## नवदुर्गा ऐश्वर्याने केली सातासमुद्रापार भरारी घेऊन पदवी प्राप्त



**मुरूम (प्रा. सुधीर पचंगल्ले) :** उमरगा येथील सुकन्येनेसातासमुद्रापार भरारी घेत युनिव्हर्सिटी कॉलेज बर्मिंगहॅम, इंग्लंड मध्ये बेकिंग पिटासरी अॅडटेक्नॉलॉजी मध्ये पदवी केली प्राप्त.सविस्तर माहिती अशी की ऐश्वर्या पाटीलचा हा प्रवास साधा सोपा सरळ नव्हता. श्री. श्री. रविशंकर स्कूल, उमरगा येथून ऐश्वर्या नामक चिमुरडी ने आपल्या प्राथमिक शिक्षणाची सुरुवात केली.

पुढे तिने माध्यमिक शिक्षण देशी केंद्र, लातूर तसेच विमलताई गरवारे हायस्कूल, पुणे असे स्थलांतर करीत दवे पब्लिक स्कूल, नवी मुंबई येथून विशेष प्राविण्यासह दहावी पास केली. महाविद्यालयीन शिक्षणासाठी डी. वाय. पाटील, नवी मुंबई येथे प्रवेश घेऊन बी. एससी. पदवी घेतली.

या शिक्षणा दरम्यान शैक्षणिक सहली साठी जर्मनी, स्वित्झर्लंड बेल्जियम, स्पेन, फ्रांस, इटली आदी देशांत जाण्याची संधी मिळाली. या निमित्ताने बेकिंग आणि डिसोर्टस या संबंधी बरीच माहिती झाली. इथेच तिने मनोमन ठरवलं की यातच आपण करियर करायचं. असं म्हणतात माणसाच्या जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या गोष्टी त्याच्या बालपणी अथवा किशोरवयीन अवस्थेत घडून जातात.

शाळकरी वयात विविध प्रकारच्या पाककृती बनविण्यात अभिरुची दाखविणारी ही किशोरी उद्याची मास्टर असेल अशी कधी कुणी कल्पना ही केली नसेल.तो तिच्या आज्या कै. दमयंती बब्रुवान मुळे आणि श्रीमती शकुंतला मधुकरराव कदम यांचे कडून भारतीय पारंपरिक सणावाराला खीर, पुरणपोळी, कटाची आमटी, वड्या आदी घरगुती पद्धतीचे तसेच वार्षिक साठवणूकीचे लोणचे,पापड, कुरड्या, सांडगे इत्यादी तिने छंद म्हणून शिकून घेतले होते.

योगायोगाने पुढे थोड्या फार फरकाने हेच तिचे ध्येय ठरले. डी. वाय. पाटील येथील पदवी शिक्षणाच्या शेवटच्या टप्प्यात तिने पुढील शिक्षणासाठी जागतिक स्तरावरील संधीचा स्वतः होऊन स्वतंत्रपणे विचार करत शोध घेतला. शेवटी प्रयत्नाला यश आले आणि लंडन येथील युनिव्हर्सिटी कॉलेज बर्मिंगहॅम येथे प्रवेश निश्चित केला. भारतात असताना कधी ही एकटीने प्रवास न केलेल्या या मुलीने इंग्लंड मधील पुढील तीन वर्षे एकटीने सारे प्रश्न हाताळले.परदेशात जाऊन ही ती आपल्या मार्गदर्शक ,शिक्षक,गणगोत, मित्र मैत्रिणी, व्यवसायातील सहकारी यांचेशी ती कायम संपर्कात असते.

अशा या गुणी मुलगीने युनिव्हर्सिटी कॉलेज, बर्मिंगहॅम (इंग्लंड) येथून मास्टर डिग्री दरम्यान लंडन येथील जग प्रसिद्ध रेस फार्म्युला १ सर्किट मध्ये फरारी कंपनी मध्ये फ्रंट स्टॉलवर १ वर्षे व नंतर सलग दोन वर्षे तिथेच व्हिआयपी लॉजवर अपॉईंटमेंट मिळाली. अशी संधी स्कॉलर नाच मिळते. ती तीने मिळविली.ही तिच्या शैक्षणिक जीवनातील अत्यंत अभिमानाची आणि गौरवपूर्ण मिळकत होती असे म्हणता येईल.उमरगा येथील यशवंत वसंतराव पाटील आणि डॉ. उमा पाटील यांच्या सुकन्येने मराठमोळ्या ऐश्वर्याने मास्टर डिग्री प्राप्त केल्याबद्दल तिचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.एका अर्थाने घवघवीत यश संपादन करणारी विज्ञान नवयुगातील ही नवदुर्गाचआहे.

## रामलिंग पुराणे यांच्या अर्जाची तहसीलदार यांनी घेतली दखल

**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मुरूम येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेच्या व्यवस्थापकास दरवेळी शासनाच्या नवीन तारखेच्या आदेशाची गरज असते, त्यामुळे ते शेतकऱ्यांचे शासकीय अनुदानित रक्कम कर्ज खात्यात कपात करून घेतात किंवा खाता होल्ड वर ठेवतात आणि शेतकऱ्यांना अपमानास्पद वागणूक देऊन हाकलून देत असतात.

सदरील विषयी सामाजिक कार्यकर्ते तथा बसव प्रतिष्ठाण अध्यक्ष रामलिंग पुराणे यांनी तीन वेळा नवीन तारखेचे पत्र आणून दिले आहेत, परत आता यांना आजच्या तारखेचे पत्र द्या म्हणून शेतकऱ्यांचे अडवणूक करत आहेत. याबाबत पुराणे यांनी दि.१८ सप्टेंबर २०२५ रोजी तहसीलदार उमरगा यांच्या कडे तक्रार दाखल केली होती.मुरूम व परिसरातील शेतकऱ्यांचे मुरूम येथील बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेत खाते असून सदरील खात्यावर प्रधानमंत्री किसान सन्मान योजना आणि पीक अनुदान, ड्रीप योजना यासह अनुदानित रक्कम शासनाकडून वर्ग करण्यात आले आहेत परंतु सदरील बँकचे व्यवस्थापक प्रधानमंत्री सन्मान योजना आणि पीक अनुदान,ड्रीप योजना यासह शासकीय योजनेतील रक्कम शेतकऱ्यांना देत नाहीत त्यामुळे शेतकऱ्यांना नाहक त्रास होत आहे.

सदरील वरील योजनेचा रक्कम कर्जात जमा करून घेतले आहेत असे सांगून शेतकऱ्यांना हाकलून देत आहेत, यापूर्वीही असाच प्रकार झाला होता त्यावेळी मा.जिल्हाधिकारी आणि तहसीलदार साहेब यांच्याशी चर्चा करून व त्यांच्या पत्रानुसार कांही शेतकऱ्यांना रक्कम दिले परंतु आता परत आजच्या तारखेच्या पत्राची मागणी बँकेतून केली जात आहे.

त्यांच्या खात्यावरील जमा असलेले प्रधानमंत्री सन्मान योजना व पीक अनुदान रक्कम,ड्रीप योजना रक्कम यासह अनुदानित रक्कम शेतकऱ्यांना देण्यास बँक व्यवस्थापक टाळा टाळा करत आहेत.अर्जाची तात्काळ दखल घेऊन शेतकरी बांधवना न्याय मिळवून द्यावे ही असे विनंती निवेदन रामलिंग पुराणे यांनी तहसीलदार गोविंद येरमे यांच्याकडे पाठवले होते.सदरील निवेदनाची तहसीलदार गोविंद येरमे यांनी दखल घेऊन पी.एम. किसान योजनेअंतर्गत व या कार्यालयामार्फत देण्यात येणारे विविध अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांना वाटप करण्यात यावी, सदर अनुदान रकमेतून शेतकरी यांच्याकडील कर्जाची वसुली करण्यात येऊ नये, यापुढून अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांना वाटप करण्यात यावे असे पत्र बँक ऑफ महाराष्ट्र मुरूम शाखा व तालुक्यातील सर्व बँकाना दि.२४ सप्टेंबर रोजी पाठवून निर्देश देण्यात आले आहेत.

शेतकरी बांधव अतिवृष्टी मुळे संकटात आहे, शासकीय योजनेचे रक्कम बँकेत अडकले आहेत, ती देण्यास बँका टाळाटाळ करीत असल्याने अनेक शेतकरी बांधवाचे पैसे खात्यात अडकून आहेत, ती रक्कम मिळाली तरी शेतकऱ्यांना तात्पुरती अडचण तरी दूर होईल, बँकाना दरवर्षी नवीन पत्र पाहिजे असे म्हणतात.

त्यामुळे तहसीलदार यांच्याकडे तक्रार नोंदवली होती त्यांनी तात्काळ दखल घेऊन शेतकऱ्यांना न्याय दिला त्याबद्दल त्यानाचे मनस्वी आभार.शेतकरी बांधवाना विनंती आहे निदान आपले कर्ज खाते चालू खाते तरी करून घ्या ही विनंती...रामलिंग पुराणेसमाजसेवक तथा अध्यक्ष बसव प्रतिष्ठाण

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ सप्टेंबर २०२५

# राजा राममोहन रॉय : भारतीय समाजसुधारणेचा दीपस्तंभ


Raja Ram Mohan Roy

भारतीय इतिहासाच्या प्रवाहात काही व्यक्तिमत्त्वे अशी घडलेली आहेत, ज्यांनी समाजाला नव्या दृष्टीकोनातून पाहण्याची शिकवण देऊन रूढीवादी मानसिकता आणि अंधश्रद्धा दूर करण्याचा मार्ग दाखवला आहे. त्या काळातील भारतीय समाज धार्मिक कुसंस्कार, जातीभेद, स्त्रीविरोधी प्रथा आणि शिक्षणाच्या अभावाने जड होत होता. अशा वातावरणात राजा राममोहन रॉय या दूरदर्शी विचारवंताचा जन्म झाला. त्यांनी आपल्या बुद्धी, धैर्य आणि अपार तर्कशक्तीच्या बळावर भारतीय समाजाला आधुनिकतेच्या मार्गावर नेले. म्हणूनच त्यांना भारतीय पुनर्जागरणाचे जनक असे संबोधले जाते. २७ सप्टेंबर रोजी त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक कार्याचा आढावा घेणे आजही आवश्यक आहे.

**बालपण आणि शिक्षण :-**

२२ मे १७७२ रोजी बंगाल प्रांतातील हुगळी जिल्ह्यातील राधानगर या खेड्यात राजा राममोहन रॉय यांचा जन्म झाला. त्यांचे वडील रामकांत रॉय जमीनदार होते आणि आई तारिणी देवी धार्मिक आणि विचारशील व्यक्तिमत्त्वाची होती. बालवयातच राजा राममोहन रॉय अतिशय जिज्ञासू, बुद्धिमान आणि अभ्यासू होते. त्यांनी संस्कृत, फारसी आणि अरबी यांसारख्या पारंपरिक भाषांचा अभ्यास केला. पुढे इंग्रजी, ग्रीक आणि हिब्रू यासारख्या पाश्चात्य भाषाही आत्मसात केल्या. या भाषिक प्राविण्यामुळे त्यांना हिंदू, मुस्लीम आणि ख्रिश्चन धर्मग्रंथांचा तुलनात्मक अभ्यास करता आला. उपनिषदांचे गहन अध्ययन, कुराणातील तत्त्वज्ञान, बायबलमधील नैतिकता यांचा अभ्यास करून त्यांनी स्वतःची स्वतंत्र आणि तर्कशुद्ध विचारसरणी विकसित केली.

**अंधश्रद्धा आणि जड परंपराविरुद्ध संघर्ष :-**

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला भारतीय समाज अंधश्रद्धा, जातिव्यवस्था, मूर्तिपूजा आणि धर्मांधतेमध्ये अडकलेला होता. या परिस्थितीत समाजात बदल घडविण्याचे काम अतिशय कठीण होते. राजा राममोहन रॉय यांनी या सर्व जडतेला आव्हान दिले. उपनिषदांवर आधारित एकेश्वरवादाचा प्रचार करून त्यांनी धर्माचे खरे स्वरूप लोकांपर्यंत पोहचवले. त्यांचा ठाम विश्वास होता की ईश्वर एकच आहे आणि त्याला जाण्याचा मार्ग सत्य, प्रामाणिकता आणि नैतिकतेतून जातो. मूर्तिपूजा, जातिव्यवस्था किंवा कर्मकांड यांचा खऱ्या धार्मिकतेशी काहीही संबंध नाही.

**सतीप्रथेविरुद्ध निर्णायक लढा :-**

भारतीय समाजातील सर्वात अमानुष प्रथा म्हणजे सतीप्रथा, ज्यात पतीच्या मृत्यूनंतर पत्नीला जिवंत जाळण्यात येत असे. समाजाने ही प्रथा धार्मिक कर्तव्य मानली होती. राजा राममोहन रॉय यांनी याविरुद्ध ठाम भूमिका घेतली. त्यांनी धार्मिक ग्रंथांचे सखोल अध्ययन करून सिद्ध केले की सतीप्रथा वैदिक दृष्टिकोनातून धर्मसिद्ध नाही. त्यांनी लेख, भाषणे, समाजजागृती आणि इंग्रज प्रशासनाकडे अर्ज करून लोकांना पटवले की ही प्रथा स्त्रीविरोधी आणि अमानुष आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे १८२९ मध्ये गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिक यांनी सतीप्रथा बंदीचा कायदा जाहीर केला. या निर्णयामुळे भारतीय स्त्रियांना जिवंत राहण्याचा अधिकार मिळाला आणि समाजसुधारणेच्या इतिहासात हा क्षण एक ऐतिहासिक टप्पा ठरला.

**स्त्रीशिक्षण आणि स्त्रीसक्षमीकरण :-**

राममोहन रॉय यांनी स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन दिले. त्यांच्या मते, समाजाची खरी प्रगती स्त्रीशक्तीशिवाय शक्य नाही. त्या काळात स्त्रियांना शिक्षणाची संधी नव्हती, त्यांचे जीवन घराच्या चौकटीत मर्यादित होते, आणि विधवांचे जीवन अत्यंत दुःखदायक होते. राजा राममोहन रॉय यांनी स्त्रियांचे हक्क, बालविवाहविरोध, विधवाविवाह यांसारख्या सामाजिक प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले. त्यांनी मुलींसाठी शाळा उघडल्या, स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रसार केला, विधवाविवाहाला प्रोत्साहन दिले आणि सामाजिक समतेचा संदेश दिला. त्यांच्या प्रयत्नांमुळे समाजात स्त्रीशिक्षणाची बीजे रुजली आणि स्त्रीसक्षमीकरणाची सुरुवात झाली.

**शिक्षणातील क्रांतिकारी योगदान :-**

राममोहन रॉय यांचा विश्वास होता की शिक्षणाशिवाय समाज प्रगत होऊ शकत नाही. पारंपरिक शिक्षण केवळ धार्मिक ग्रंथांपुरते मर्यादित होते. त्याने आधुनिक विज्ञान, तर्कशास्त्र, इतिहास, गणित यांचा अभाव होता. राममोहन रॉय यांनी इंग्रजी माध्यमातून शिक्षणाला प्रोत्साहन दिले. त्यांनी कलकत्त्यात इंग्रजी शाळा स्थापन केली, हिंदू कॉलेजमध्ये योगदान दिले, तसेच विद्यार्थ्यांना आधुनिक ज्ञानाचे महत्त्व पटवून दिले. शिक्षणामुळे भारतीय तरुणांना जागतिक ज्ञानाशी जोडले जाईल आणि समाजात नवीन विचारांची ऊर्जा निर्माण होईल, असा त्यांचा विश्वास होता.

**ब्रह्म समाज आणि धार्मिक सुधारणे :-**

१८२८ मध्ये त्यांनी स्थापन केलेला ब्राम्हो समाज एकेश्वरवाद, सामाजिक समानता, स्त्रीसक्षमीकरण आणि धार्मिक सहिष्णुतेवर आधारित होता. ब्राम्हो समाजाच्या माध्यमातून मूर्तिपूजा, जातिव्यवस्था आणि अंधश्रद्धा यांचा विरोध केला गेला. स्त्रियांच्या शिक्षणाचे, विधवांच्या हक्कांचे, धार्मिक उदारमतवादाचे संदेश या समाजातून प्रसारित झाले. ब्राम्हो समाजाने भारतीय समाजात सुधारणा घडवून आणण्याचे संघटित स्वरूप दिले आणि पुढील सुधारकांसाठी प्रेरणास्थान ठरले.

**पत्रकारितेत योगदान :-**

राजा राममोहन रॉय यांनी पत्रकारितेतून विचारप्रसार केला. त्यांनी 'संवाद कौमुदी' आणि फारसी नियतकालिक 'मिरात-उल-अखबर' सुरू केले. या माध्यमातून त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, जातिव्यवस्था, स्त्रीविरोधी प्रथा, शिक्षणाचा अभाव यावर लेखन केले. ब्रिटिश प्रशासनाच्या अन्यायकारक धोरणांचा निषेध त्यांनी या माध्यमातून केला. त्यांच्या पत्रकारितेने भारतीय समाजात जनमत घडवले आणि सुधारणा घडवण्यास चालना दिली.

**ब्रिटिश प्रशासनाशी संबंध :-**

राममोहन रॉय यांचे ब्रिटिश सत्तेशी नाते जटिल होते. एकीकडे त्यांनी इंग्रजांच्या आधुनिक शिक्षणाचे स्वागत केले, आधुनिक विज्ञान आणि तर्कशास्त्राचा प्रसार केला, तर दुसरीकडे त्यांनी शोषणकारी धोरणांचा निषेध केला. भारतीयांना न्यायालयीन साक्षीदार म्हणून मान्यता मिळावी, मालमत्तेवरील हक्क मिळावेत यासाठी त्यांनी ब्रिटिश प्रशासनाकडे अर्ज केले. १८३० मध्ये ते इंग्लंडला गेले आणि तिथे भारतीय समाजाचे प्रश्न मांडले. त्यांनी ब्रिटिश जनतेसमोर भारतीयांच्या हक्कांची बाजू मांडली आणि जागतिक स्तरावर भारतीय समस्यांकडे लक्ष वेधले.

**अंतिम वर्षे आणि निधन :-**

इंग्लंडमध्ये कार्यरत असतानाच २७ सप्टेंबर १८३३ रोजी ब्रिस्टल येथे राममोहन रॉय यांचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूने भारतीय समाजाने एक महान सुधारक गमावला, पण त्यांच्या विचारांचे तेज आजही समाजाला मार्गदर्शन करते. त्यांच्या कार्यामुळे भारतीय समाजाला आधुनिक शिक्षण, स्त्रीसक्षमीकरण, धर्मसहिष्णुता आणि तर्कशुद्ध विचार यांचा साक्षात्कार झाला.

**वारसा आणि आधुनिक संदर्भ :-**

राममोहन रॉय यांच्या कार्यामुळे भारतीय समाजात आधुनिकतेचे बीज रुजले. स्त्रीसक्षमीकरण, धार्मिक उदारमतवाद, शिक्षणाचा प्रसार, अंधश्रद्धाविरोधी चळवळ आणि पत्रकारितेत स्वातंत्र्य या सर्व गोष्टींमध्ये त्यांचा ठसा आजही दिसतो. त्यांच्या विचारांचा प्रभाव केवळ बंगाल किंवा भारतापुरता मर्यादित नाही; तो जागतिक स्तरावर भारतीय समाजाच्या सुधारणा प्रवाहात देखील महत्त्वाचा ठरतो. आजच्या काळात स्त्रीशिक्षण, लिंगभाव समानता, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्याय यावर जे काम चालू आहे, त्यामागे राममोहन रॉय यांच्या दूरदर्शी विचारांचा प्रभाव आहे.

**निष्कर्ष :-**


शेवटी, असे म्हणता येईल की, राजा राममोहन रॉय हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर आधुनिक भारताचे शिल्पकार होते. त्यांनी ज्या काळात कार्य केले, त्या काळात त्यांचे विचार क्रांतिकारी होते. सतीप्रथा बंद करणे, स्त्रीशिक्षणाला चालना देणे, बालविवाह व बहुपत्नीत्व विरोधी चळवळीला पाठबळ देणे, ब्राम्हो समाजाच्या माध्यमातून धार्मिक उदारमतवादाचा प्रचार करणे, इंग्रजी शिक्षणाचा प्रसार करणे आणि पत्रकारितेचा प्रभावी वापर करणे, हे सर्व त्यांच्या दूरदर्शी कार्याचे ठळक उदाहरणे आहेत. २७ सप्टेंबर रोजी त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त आपण त्यांचे स्मरण करतो, त्यांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवतो आणि समाजातील विषमता, अन्याय व अंधश्रद्धा दूर करण्यासाठी त्यांच्या विचारांची प्रेरणा घेतो.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. क्र. ९९६०१०३५८२,
ईमेल – bagate.rajendra5@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २७ सप्टेंबर २०२५

# अस्वस्थ : वर्तमानाच्या पानावरचा अस्वस्थ वेदनेचा हुंकार




'पोळणाऱ्या सावल्या' या काव्यसंग्रहाचे ख्यातकीर्त कवी कैलास भाले यांचा दुसरा कवितासंग्रह 'अस्वस्थ'.मुद्रा प्रकाशन,जालना.मुखपृष्ठ भ.मा. परसवाळे, ख्यातनाम चित्रकार श्रीधर अंभोरे,व राजू बाविस्कर यांची सृजन संपन्न रेखाटने.अक्षर मुद्रण नारायण पाझाडे अप्रतिम.वर्तमानाच्या पानावरचा अस्वस्थ वेदनेचा हुंकार फुले शाहू आंबेडकरांच्या विचारांची बांधिलकी व धारदार निर्धार व निस्सीम भूमिका घेऊन काव्यलेखन करणारेनिष्ठावंत पाईक ख्यातनाम कवी कैलास भाले यांच्या अस्वस्थ वेदनाची तळमळ म्हणजे परिवर्तनाची चळवळीचं झालेलं मातेरे.ही कविता सर्वहारा समाजातील व्यथावेदनेची अस्वस्थता आहे.'सगळयांचं भलं झाल्यावर माझं ही भलं व्हावं' तथागत बुद्धांच्या कारुण्याचा ध्यास घेत समकालीन मानवी मनाचे जातीचे हुंकार आज वास्तवाचे चटके सखेद संवेदनेनं कवीने या कवितेमधून अस्वस्थपणे मांडले आहेत.तोल, रस्ता, स्नेह, जन्म,समज,तडे,माय, दु:ख,उमज, पाऊस, प्रार्थना,भूक, स्वप्न, रंग,पेट सांगावा ही कवितेची शिर्षक सविनय सम्यक दृष्टी सकारात्मक विचारधारा घेऊन ही कविता अस्सल अस्वस्थ वेदना मुखर करते.खरंच आज तोल जातो आहे.रस्ते बेईमान होता आहेत.स्नेह आपुलकी जिव्हाळा माया राहिली नाही.माणुस म्हणून तो फक्त भावना शुन्य झाला आहे.इथे माणुसकीला तडे जात आहेत.हे सारे दु:ख उमज येऊन ही समज गैरसमजीचा पाऊस पडतो आहे.निर्मळ निर्लेप नितळ मनाने ही कविता प्रार्थना करते.जाती पातीच्या लवकंडी लाऊन इथं बेमालूम माणसं माणुसकीने दुरावताहेत.ही अशांत अस्थिरता थांबली पाहिजे.आपण भूक भूकेच्या भाकरीसाठी जगत होतो.ती मिळावी म्हणून प्रार्थना.भूके नंतर स्वप्न या साठी माणूस मान्या सांगावा.नाहीतर जाती पातीच्या उचापत्या करून सोईच्या सईनेथिगळं लाऊन अंधाराला शिलाई करता आहेत..कवी कैलास भाले उद्याची 'पहाट' या कवितेचा निर्धार पहा."तुला पाहून माझ्यात नरत्व अन् मला पाहून तूझ्यात मादीत्व जागं होतं तर मग चल ना जाती भेदाची पहाट होण्या आधीच्या त्या अंधारात."..(पृ.३२) या कवितेने मानवी मूल्यांची बंधुत्वाची,व जीव कल्याणाची भाकनूक केली.आज सारेच मूल्य पायदळी तुडवून स्वार्थाची खंजीरी वाजवणारे यारस्तो रस्ती मोर्चे उपोषणे करतांना दिसता आहेत.भालेंचीकविता चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक विवेचक आहेच.इथल्या गाभडलेल्या व्यवस्थेत विचारांचा शहाड देतं ही कविता अस्वस्थ तळाचा शोध घेते.ज्यांनी जीवाची बाजी लावली तो बाजीप्रभूचा इतिहास!अस्वस्थ वर्तमानाची नोंद घेतांना ही कविता थेट प्रश्न करते ती अशी "लढला होता प्रत्येक जन,गटागटाने..तटासाठी पेटल्या गंज्या मिळाला संकेत,तुम्ही सुरक्षित झाल्याचे पण निकाराने धारातिर्थी पडणारा,"वर्तमानाच्या पानावरचा बाजीप्रभू कुठे आहे?इतिहास किती दिवस शिकवू?"(पृ.८२)शिक्षकाला हा प्रश्न पडतो इथल्या महापुरुषांच्या कार्याची त्यांची महानता ओळीत मावणारी नाही.पण या व्यवस्थेने महापुरुषांच्या जयंती,पुण्यतिथींच्या जाती पातीत वाटण्याचं करून घेतल्या.अनेक युगांचा खरा इतिहासकेवळ पुस्तकी राहिला आणि मस्तकी अस्वस्थतेचा मळवट आला.मारोतीच्या मंदिरा समोर शहाड वाजवतो आणि बाबासाहेबांच्या पुतळ्या समोर का नाही.ही अस्वस्थ वर्तमानाची वेदना पहा संघर्ष,"बाबासाहेबांच्या पुतळ्याला शहाडा का देतं नाही या उर्मट विचाराने, बुध्दवाड्यातल्या तरूण कार्यकर्त्यांनी डफड फोडून,वाजवणाऱ्यालाच बेसुमार वाजवले;आणि सुरू केला गावात गावकुसाबाहेरचा नवा संघर्ष"..(पृष्ठ ८३)कवी कैलास भाले यांच्या आत्मानुभूतीची ही कविता आहे.या कवितेचा मर्मग्राही अनुबंध म्हणजे जे समकालीन वास्तवाचे भान व जान देतांना हा सर्वहारा बहूजन समाजबांधव अजूनही भयमुक्त झाला नाही.त्याच्या लाचारीचे स्वरूप बदलले आहे.तो हुजरेगीरीलाच आपली नैतिकता मानतो आहे.ऋण,पुस्तक,धुर,चित्र,कवी, जिव्हाळा,घागर, भंडारा, स्पर्श, मुक्त, चळवळ,वाघ,माती, शोध,दूध,उकल वाटणी, वहिवाट,भान,सक्ती, सावली,भाव, ओळख, अस्वस्थ या कवितेमधून हे ऋण कायम राहीले पाहिजे हा अस्वस्थेचा धूर त्याचे चित्र म्हणून जिव्हाळा कायमचं आहे "बी तपासूनच आता पेरले पाहिजे,जूने मागायचे सोडून,दान आणि दातृत्वाचे धनीच, आपण आता बदलले पाहिजे,ही सम्यक विद्रोह ही कविता देते.आंबेडकरी'चळवळ' का थांबली?हा भयंकर व्यथा वास्तवतेची दुखरी खंत कवीने व्यक्त केली आहे."भडवे होऊन गोडवे गाणारे,जर चळवळीत आले तर ते अस्सल डॉबरमॅन कुत्र्याची अवल्याद आणि त्यांच्या घरात ही अशीच पाळलेली कुत्री "परिवर्तनाची चळवळ, अधिक गतिमान का होतं नाही?म्हणताच, चोहोबाजूंनी मला चवताळून भूंकण्याचा आवाज आला,मी दचकलो, आणि रॅबीजच्या भीतीने चप्पल तिथेच सोडून धुम पळलो, तेव्हा मुठी माझ्या सैल होत्या"(पृ.४७)कधी काळी चळवळीचा वाघ म्हणुन घेणारा ही आता शेळपट झाला आहे.कारण लाळघोट्या तमाम लबाडांना हडूक चघळत दारात बसवले आहे.इथे फुले शाहू आंबेडकरांच्या विचारांची बांधिलकी निर्धार बोथट झाला आहे.शहरात आणि खेड्यातही ही वाघ बेपत्ता झाली आहे."तेव्हा माझ्या अंत:करणात सामाजिक वनीकरणालाच आग लागते"(पृ.४९)मलपृष्टाची पाठराखण श्रेध्दय आ.ह.सोळूंखे मनोज्ञ भावनेतून लिहितात,"परिवर्तनाची चळवळ अधिक गतिमान का होतं नाही याचाही त्यांची कविता करते.करूणेनं, भावनेनं, आणि विचारानं ओतप्रोत भरलेला माणूसच समृद्ध समाज जीवनाच स्वप्न पाहतो.त्यासाठी धडपडतो.समाजातल्या व्यवस्थेत अगदी तळात राहिलेला, अभावग्रस्त पडझडीतला माणुसही विचारांनी ओथंबून लिहितो विचार करू लागतो.फुलून येतो. हे आनंदायी आहे.म्हणूनच कैलास भालेंचा हा काव्यसंग्रह समाजभान आणि समाजमनाचं आशय संपन्न सृजन समर्पक काव्यदर्शन आहे "हे कवीच्या कवितेचं मोठेपण आहे.कवीने समृद्ध गणगोत गोतावळा मनस्वी भावनेतून जपला आहे.याची नोंद येते.मनातलं - "ही अस्वस्थता कागदावर उतरवली नसती तर कदाचित उर फोटून मी मेलो असतो" कवी प्रांजळपणे ऋण व्यक्त करतो 'माझी अस्वस्थता जपणारे'ही कविता कवीचे सखेद भावनेचा निचरा आहे.जो मोठ्या सृजनशील अभिव्यक्तीने व्यक्त झाला आहे.साक्षेपी समीक्षक डॉ गजानन जाधव लिहिता,"ही अस्वस्थता वाट्याला आलेल्या गरीबीची, पदरात पडलेल्या उपेक्षेची, हेटाळणीची,समाज व्यवस्थेने छळलेल्या कवीची,ही अस्वस्थता आहे,या संग्रहातील प्रत्येक कविता ही आश्वासक आहे, अर्थपूर्ण आहे.या कवितेच्या खोलवर उतरावे लागते."असा चिंतन आशय संपन्न साक्षेपी समीक्षक दृष्टीचे विश्लेषण त्यांनी केले आहे.खरेतर कविताही दुधारी तलवार आहे.त्यात कवीची काव्यनिष्ठा पहा."पायाखालची वाळू वाहत्या पाण्याबरोबर बेमालूम निसटून जावी आणि निराधार आभाळ डोळभर साठवून जाणारा तोल सांभाळावा कसाबसा अगदी असंच होतं कवितेतू जवळ नसते तेव्हा..(पृष्ठ १६) हा तोल असमतोल झाला तर कवीच मातीमोल होतो.कविते विषयीची निस्सीम भक्ती निष्ठावंत भूमिका घेऊनच साकार होते.कवी डॉ मारुती कसाब यांची अतिशय मौलिक अधिष्ठान प्राप्त करून देणारी अभ्यासपूर्ण साक्षेपी प्रास्तावाना हे या कवितेचं श्रेयस आहे."मोडून पडलेल्या माणसाला जगण्याचं बळ देणारी ही कविता...'दुबळ्यानी कायम दुबळेच राहवे.यासाठी व्यवस्थेने त्यांच्या गळ्यात देव नावाचे लोढणे घातले.'मागून मिळते ती भीक आणि न मागता मिळते तीही भिकचं. हे तिने पक्के जाणले होते.उदरनिर्वाहचे साधन नसतात गावाच्या पोकळ सहानुभूतीवर जगायचे नाही म्हणून लेकरांना घेऊन शहराचा रस्ता धरला.मुलगा शिक्षण करून मास्तर झाला.पुस्तकाच्या सहवासात आणि आईच्या कष्टप्रद तळहातावर विश्वास ठेवून जगण्याचं भलपण शोधुन कविता श्वास करून या व्यवस्थेची अस्वस्थ वर्तमानाची दखल घेऊ लागला".या कवितेचा बोलीभाषीक मर्मग्राही आस्वाद ही मौलिक अधिष्ठान प्राप्त करून देणारा लक्षवेधी आहे.जसे गावगाड्यातील शब्द बिरकंन,तोडा,डफड्याची घाय,पायसूणी, खुन्नस,यडीबाभूळ,धिगामस्ती,काळतों डी,कबरीबांडी,खुस्पट,धस्कट,फारसा दगड,नवा मार्कुट,हाडेभाडे,बिशाद,दांगडू,चिलीम, उतू जाणे,सोटमुळ या अस्सल ग्रामीण शब्द साकल्याने ही कविता समृद्ध आहे.कवी कैलास भाले यांच्या आत्मानुभूतीची ही अस्सल जखमेची अवस्था खदखदून अस्वस्थतेची वेदना देऊन जाते.कवीने आपली नाममुद्रा निश्चित केलीच आहे.या मनस्वी कवीला मन:पूर्वक शुभेच्छा.

**अस्वस्थ:कवी कैलास भाले**
(कवितासंग्रह)[]
**समीक्षक:- डॉ प्रभाकर शेळके,**
जालना []
मो. ९९७५१३७३३७
प्रकाशक:-मुद्रा प्रकाशन,
खडक तलाव जालना [] मुखपृष्ठ,:-भ मा परसवाळे[]
पृष्ठ:-८८[] मूल्य:-१७५